# कोविड–१९ चा युवकांच्या शिक्षणावर झालेल्या परिणामांचे विश्लेषणात्मक समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ. प्रदिप रा. भानसे**
सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,
शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय,
अर्जुनी मोर, जि. गोंदिया
pradipbhanseuas03@gmail.com
7020441874

---

**सारांश –**

शिक्षण ही द्विमार्गी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेच्या माध्यमातून शिक्षक व विद्यार्थी यांच्यात प्रत्यक्ष आंतरक्रिया प्रस्थापीत होऊन दोघेही एक दुसऱ्यांना आपले विचार, कृती व भावनेने प्रभावित करतात. मात्र मार्च २०२० मध्ये देशात कोविड–१९ मुळे जी भयंकर परिस्थिती उद्‌भवली त्याचा सर्वाधिक नकारात्मक परिणाम युवकांच्या शिक्षणावर झाला. शिक्षण प्रक्रिया जवळ –जवळ बंद पडली आणि त्यामुळे युवकांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झाला. कोविड–१९ च्या काळात समाज माध्यमातून (Social Media) असा प्रचार–प्रसार होऊ लागला की, आता विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याची जडणघडण करण्यासाठी ऑनलाईन शिक्षणाशिवाय पर्याय नाही. मात्र ऑनलाईन शिक्षणाचा प्रतिकूल परिणाम आता दिसू लागला आहे. पारंपरिक शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे भविष्य प्रत्यक्ष वर्गखोल्यातून घडविले जाते. यामध्ये विद्यार्थी शिक्षण संस्थेत अभ्यास व अभ्यासेत्तर उपक्रमात सहभागी होतो. ज्यातून त्याला विविध प्रकारचे अनुभव येतात. हेच अनुभव त्यांच्या भावी उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करते. मात्र कोविड–१९ मुळे जी परिस्थिती उद्‌भवली व युवकांना अध्यापन करण्यासाठी ऑनलाईन शिक्षण पद्धती उदयास आली, त्याचा विद्यार्थ्यांच्या ज्ञान स्वीकारण्याच्या प्रक्रियेवर कितपत प्रभाव पडतो व त्यांच्या ज्ञानात किती भर पडते हा या संशोधन पेपरचा प्रमुख विषय आहे. याशिवाय भारतासारख्या देशात शहरी व ग्रामीण भागात प्रचंड गरिबी आहे. जवळपास ४० टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली जीवनयापन करतात. अशा परिस्थितीत गरिबीला सामोरे जात युवक ऑनलाईन शिक्षण कसे घेऊ शकेल? एकूण कोविड–१९ चा विद्यार्थी व युवकांच्या शिक्षणावर काय परिणाम झाला? हे या पेपरच्या माध्यमातून समजून घेता येईल.

**कळीचे शब्द** – शिक्षण, पारंपरिक, ऑनलाईन, कोविड–१९, युवक

**प्रस्तावना –**

शिक्षणात दोन प्रमुख अंगांचा समावेश होतो, तो म्हणजे अध्ययन व अध्यापन. अध्ययन ही एक मानसिक क्रिया मानली गेली आहे. शिक्षणाच्या संदर्भात जी विविध संशोधने झाली आहेत. त्यानुसार शिक्षण ही एक मानसिक प्रक्रिया मानली गेली आहे. गेट्स हा शिक्षणशास्त्रज्ञ म्हणतो, "शिक्षण म्हणजे वर्तनात घडून येणारा विकासशील बदल होय."[१] प्रत्येक व्यक्ती येणाऱ्या अनुभवानुसार आपल्या वर्तनामध्ये जो बदल करीत असतो त्याला शिक्षण असे म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाविषयी मत व्यक्त करतांना म्हटले की, ''व्यक्तीला जाणीव करून देणे ते शिक्षण होय."[२]

शिक्षण म्हणजे ज्ञान किंवा विद्वता हा विचारही बराच मान्यता पावलेला आहे व मर्यादित अर्थाने तो खराही आहे. परंतु ज्ञान म्हणजे केवळ पुस्तकी पांडित्य नव्हे. ज्या ज्ञानाला अनुभूतीचा आधार नाही, किंवा जे ज्ञान व्यवहारात, आचरणात, जीवनात उतरत नाही त्या ज्ञानाला फार तर ''माहिती'' (Information) म्हणता येईल. प्रसिद्ध तत्वज्ञ व्हाईटहेड अशा ज्ञानाला जड, चैतण्यरहित किंवा निष्क्रिय कल्पना असे म्हणून त्याचा निषेध करतो.[३]

ज्ञान हे केव्हाही श्रेष्ठ परंतु आक्षेप आहे तो निव्वळ शब्दज्ञानाला, निष्क्रिय ज्ञानाला. कृती, चरित्र व एकूण जीवनाशी कोणत्याही प्रकारे संबंध नसलेल्या ज्ञानाला. असे कोरडे ज्ञान किंवा पुस्तकी विद्वता म्हणजेच शिक्षण असे माणने म्हणजेही शिक्षणाचा अर्थ मर्यादित व संकुचित करणे होय. म्हणूनच गांधीजी म्हणतात, "शिक्षणाच्या उद्दिष्टांमध्ये साक्षरतेसोबत उत्पादन क्षमता, नागरिकत्वाची जाणीव, चांगल्या सवयी, सामाजिकता, सुसंस्कार, सद्‌भीरूची यांचा समावेश झाला पाहिजे."[४]

**शिक्षणाचा तात्विक अर्थ –**

शिक्षण म्हणजे उपदेश करणे व बदल घडवून आणणे. या व्युत्पत्तीनुसार गुरूने, शिक्षकाने किंवा ज्येष्ठ व्यक्तीने शिष्यात, विद्यार्थ्यात संस्कार करून घडवून आणलेला बदल म्हणजे शिक्षण होय. शिक्षण या शब्दांचा इंग्रजी प्रतिशब्द 'Education' आहे. याच्याही लॅटीन भाषेनुसार दोन व्युत्पत्ती दिल्या आहेत.

१) Educare – To rear, to nourish, to bring up - पालनपोषण करणे, वाढविणे, संवर्धन करणे.

२) Educere – To lead out, To draw out – व्यक्तीच्या जन्मजात सुप्त गुणांना जागृत करून, चालना देऊन त्याचा आविष्कार करणे, विकास करणे.

सारांशरूपाने शिक्षण म्हणजे बाहेरून ज्ञान आत घालण्याची प्रक्रिया नसून मुलांमध्ये मूलत:च व निसर्गदत्त असलेल्या अंत:शक्तींचा आविष्कार व विकास होय. या संदर्भात प्लेटो म्हणतो, ''प्रत्येक माणसात काही विशिष्ट प्रमाणात जन्मजात, निसर्गदत्त शक्ती असतात त्यांना जागृत करून पूर्णत्वास नेणे म्हणजे शिक्षण होय."[५]

भारतीय शिक्षण आयोग डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमला होता. त्या आयोगाच्या सुरूवातीलाच ''भविष्यकाळात भारताचे भवितव्य वर्गखोल्यातून घडणार आहे" असे म्हटले हाते. आयोगाने जे दहा कार्यक्रम सुचविले त्यामध्ये शिक्षणातून सामाजिक व नैतिक मूल्ये विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तके आणि अभ्यासेतर कार्यक्रम यांची रचना हवी असे मत व्यक्त केले.[६]

शिक्षणाच्या संदर्भातील असलेली ही वरील सर्व चर्चा जे शिक्षण शाळा, महाविद्यालयातून, वर्गातून, प्रत्यक्ष शिक्षकाच्या माध्यमातून दिले जाते. त्या संदर्भातील आहे. कारण याच पारंपरिक शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षक व विद्यार्थी यांचे सामाजिक संबंध प्रस्थापित होतात. अभ्यासक्रमातून शिक्षक विद्यार्थ्यांना अनेक सामाजिक मूल्ये, बोध, प्रमाणके प्रदान करतात. विद्यार्थी ती मूल्ये व प्रमाणके अंगीकृत करतात आणि सामाजिक भूमिका या मूल्ये व प्रमाणकांच्या अनुषंगाने वठविण्याचा प्रयत्न करतात.

कोविड–१९ मुळे जी परिस्थिती उद्‌भवली त्यामुळे संपूर्ण देशात लॉकडाऊन घोषित करण्यात आला. शाळा, महाविद्यालये बंद करण्यात आली. विद्यार्थ्यांचे शिक्षण त्यामुळे ठप्प झाले. यातून मार्ग काढण्यासाठी ऑनलाईन शिक्षण पद्धती उदयास आली. ऑनलाईन शिक्षण हे अशाप्रकारचे शिक्षण आहे की, जे स्मार्ट फोनच्या माध्यमातून दिले जाते. यामध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष संबंध येत नाही. शिक्षक आपल्या व्यवहाराने व विचाराने विद्यार्थ्यांना प्रभावित करू शकत नाही. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी शिक्षक दूर करू शकत नाही. त्यामुळे ऑनलाई शिक्षण पद्धत ही एकमार्गी प्रक्रिया असून त्याचा विद्यार्थ्यांचा शिक्षणावर व एकूण भवितव्यावर फारसा अनुकूल प्रभाव पडत नाही.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१. कोविड–१९ चा मुलांच्या शिक्षणावर झालेल्या परिणामाचे अध्ययन करणे.

२. कोविड–१९ व लॉकडाऊनमुळे निर्माण झालेली विपरित परिस्थिती शिक्षणाच्या संदर्भात समजून घेणे.

**संशोधनाचे महत्त्व –**

भारतात २४ मार्च २०२० पासून कोविड १९ च्या संसर्गामुळे लॉकडाऊन घोषित झाला. बऱ्याच शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम अपूर्ण राहिलेला होता. परीक्षा संपन्न व्हायच्या होत्या. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून अनेक शाळा, महाविद्यालयांनी ऑनलाईन पद्धतीने, स्मार्ट फोन, लॅपटॉप व कॅम्प्यूटरच्या माध्यमातून शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. सुरूवातीला अशा ऑनलाईन शिक्षणाची कोणतीही पूर्वसूचना विद्यार्थ्यांना नव्हती. अशाही परिस्थितीत ऑनलाईन शैक्षणिक उपक्रम स्मार्टफोनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविले. मात्र विद्यार्थ्यांनी त्याचे कितपत उपयोजन केले वा विद्यार्थ्यांनी ते कितपत आत्मसात केले? हा प्रश्नच आहे.

**तथ्य संकलन पद्धती –**

१. प्रस्तुत संशोधनात प्राथमिक तथ्य संकलनासाठी अनुसूची तयार करून विद्यार्थी उत्तरदात्यांकडून भरून घेण्यात आली.

२. द्वितीयक तथ्य संकलनात प्रकाशित व अप्रकाशित लिखित प्रलेखाचा यामध्ये अंतर्भाव करण्यात आला.

प्रस्तुत संशोधनात कोविड–१९ मुळे युवकांच्या शिक्षणावर झालेल्या प्रभावाचे अध्ययन करण्यासाठी एकूण १६ बाबींचे एक अनुमाप तयार करण्यात आले. कोविड–१९ मुळे जो लॉकडाऊन घोषित झाला, त्यामुळे महाविद्यालयांनी स्मार्टफोनच्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू केला. म्हणून उत्तरदात्यांना आपल्याकडे स्मार्टफोन आहे काय? असा प्रश्न विचारण्यात आला. प्रस्तुत प्रश्नाला ४० टक्के उत्तरदात्यांनी आपल्याकडे स्मार्टफोन असल्याचे म्हटले आहे. यावरून फक्त ४० टक्के विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन असल्यामुळे बरेच विद्यार्थी ग्रामीण भागात गरिबीमुळे स्मार्ट फोन विकत घेऊ शकले नाही हे स्पष्ट होते. अध्ययनातील विद्यार्थी हे तालुक्याच्या ठिकाणापासून किमान ५ व २२ किलोमीटर इतक्या अंतरावर दुर्गम भागात राहतात. यातील बरीच गावे ही आदिवासी व नक्षलग्रस्त आहेत.

६५ टक्के उत्तरदात्यांनी त्यांच्या गावात उच्चदर्जाचे नेटवर्क नसते असे म्हटले आहे तर ३५ टक्के उत्तरदात्यांनी नेटवर्क कमकूवत असल्याचे म्हटले आहे. याचा अर्थ असा की, विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्थित देवाण—घेवाण होत नाही. म्हणजे शैक्षणिक उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत व्यवस्थितरित्या पोहचू शकला नाही. किंवा पोहोचण्यास अडचणी निर्माण होतात. अर्थात बरेच विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहिले.

युवकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा प्रभाव वा परिणाम त्यांच्या शिक्षणावर होऊ शकतो. ज्यांची आर्थिक स्थिती उत्तम असते ते अनेक प्रकारच्या शैक्षणिक बाबी, सेवा खरेदी करू शकतात. मात्र ज्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती खालावलेली असते. ज्यांच्या मूलभूत, आवश्यक गरजांचीच पूर्तता व्यवस्थित होऊ शकत नाही. तर शैक्षणिक बाबी कशा खरेदी करू शकतील. अध्ययनात स्मॉर्टफोन, लॅपटॉप, कॉम्प्यूटर, प्रिंटर महत्त्वाची भूमिका बजावू शकते. मात्र अध्ययनात ४० टक्के उत्तरदात्यांकडे स्मॉर्टफोन अस्तित्वात असला तरी लॅपटॉप, कॉम्प्यूटर, प्रिंटर उपलब्ध नसल्याचे म्हटले आहे. याचा विपरित परिणाम त्यांच्या शिक्षणावर झालेला दिसतो.

अध्ययनातील सर्व उत्तरदाते दुर्गम, आदिवासी व नक्षलग्रस्त भागात राहतात. अध्ययनातील ३६ टक्के उत्तरदाते विज्ञान शाखेतील, ३० टक्के उत्तरदाते कला शाखेतील तर ३४ टक्के उत्तरदाते वाणिज्य शाखेत शिक्षण घेणारे आहेत. हे विद्यार्थी २९ टक्के द्वितीय सत्र, ४२ टक्के चवथे सत्र तर २९ टक्के उत्तरदाते सहाव्या सत्राचे आहेत. त्यांचे विशयसुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे. कला शाखेला इंग्रजी व मराठी या विषयासोबत समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, गृहअर्थशास्त्र, इंग्रजी वाङ्मय, मराठी वाङ्मय यावि  ायाचे शिक्षण घेतात. वाणिज्य शाखेत इंग्रजी व मराठी या विषयासोबत EDV. अकाउंट, आय.टी., कॉम्प्यूटर, संख्याशास्त्र हे विषय शिकतात तर विज्ञान शाखेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, गणित, सुक्ष्मजीवशास्त्र या विषयाचे अध्ययन करतात.

कला शाखेतील भूगोल व गृहअर्थशास्त्र हे प्रात्याक्षिक असणारे विषय ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थी कसे शिकणार? या शिवाय सामाजिक शास्त्रे सुद्धा ऑनलाईन पद्धतीने शक्य नाही. व्यवहारातील व आजूबाजूच्या पर्यावरणातील अनेक गोष्टींचा संदर्भ दिल्याशिवाय ते शक्य नाही. विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तके वाचता येत नाही. सोबतच समाजशास्त्र, भूगोल, इतिहास व इतरही विषयाचे क्षेत्रकार्य अध्ययन (Field work study) असते. हे क्षेत्रकार्य अध्ययन त्यांना नवीन शैक्षणिक व सामाजिक अनुभव देत असतात. या अनुभवातून वेगवेगळी कौशल्ये विकसित होण्यास मदत होते.

वाणिज्य व विज्ञान शाखेतील विषयसुद्धा महत्त्वाचे आहेत. वाणिज्य शाखेत वर्गात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष नवीन शैक्षणिक अनुभव मिळतो. याशिवाय वेगवेगळ्या उद्योगाला, बॅकेला विद्यार्थ्यांच्या भेटी आयोजित केल्या जातात. विज्ञान शाखेतील सर्व विषय सिद्धांत व प्रत्यक्ष कृती (Theory & Practical) अशा स्वरूपाचे आहेत. वर्गात जो सिद्धांत शिकविला जातो, त्याची प्रत्यक्ष कृती प्रयोगशाळेत करून पाहायची असते. अशी प्रत्यक्षकृती ऑनलाईन पद्धतीने करू शकत नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते.

कोविड–१९ मुळे देशात लॉकडाऊन झाल्यामुळे ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांना शिक्षण देणे सुरू झाले. मात्र या विपरित परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचाही विचार करणे आवश्यक आहे. म्हणजे समाजशास्त्र व शिक्षण यांच्या पारस्पारिक संबंधाचा विचारही महत्त्वाचा ठरतो. समाजशास्त्र मानवी समाजांचा वैज्ञानिक पद्धतीने म्हणजे सांगोपांग व पद्धतशीरपणे अभ्यास करणारे शास्त्र आहे. प्रा. गिन्सबर्ग समाजशास्त्राची व्याख्या करतांना म्हणतात, “समाजशास्त्र हा मानवा–मानवातील आंतरक्रियांचा व परस्पर संबंधाचा, ते नियंत्रित करणाऱ्या परिस्थितीचा व त्यांच्या परिणामांचा अभ्यास म्हणजे मानवा–मानवातील परस्परसंबंधातून जे काही घडते त्याचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.”[७]

शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या वर्तमान घडून येणारा विकासशील बदल होय. परंतु सामाजिक वातावरणही या विकास प्रक्रियेला फार मोठ्या प्रमाणात सहाय्यभूत होत असते. म्हणून शिक्षणाचा विचार करतांना सामाजिक संबंधाचा व आर्थिक स्थितीचा विचार करणे आवश्यक ठरते. अध्ययनात ७६टक्के विद्यार्थ्यांचे कुटुंब शेतीशी निगडीत आहे तर २४ टक्के विद्यार्थ्यांचे पालक रोजमजुरी, शेतमजुरी सारखी मिळेल ती कामे करतात. ७२ टक्के विद्यार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न २५ हजार रूपयापर्यंत आहे. १२ टक्के विद्यार्थ्यांचे उत्पन्न २५ ते ५० हजार रूपर्यापर्यंत व १६ टक्के विद्यार्थ्यांचे उत्पन्न ५० ते ७५ हजार या दरम्यान आहे. आर्थिक परिस्थितीसोबतच त्यांचे सामाजिक स्थान सुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती २० टक्के, अनुसूचित जमाती १६ टक्के, इतर मागासवर्गीय (OBC) ४४ टक्के, विशेष मागासवर्गीय (SBC) १२ टक्के, भटके विमुक्त ८ टक्के, उत्तरदाते आहेत. अर्थात, १०० टक्के विद्यार्थी मागासवर्गीय समाजाचे आहेत. म्हणजेच त्यांचे सामाजिक स्थान निम्न आहे. अर्थात आर्थिक परिस्थितीही जेमतेम आहे. मंडल आयोगाने आपल्या अहवालात म्हटल्याप्रमाणे परंपरागत स्तरीकरणाच्या जाती व्यवस्थेत ज्या जाती सामाजिकदृष्ट्या वरच्या स्थानावर आहे. त्याच जाती आर्थिकदृष्ट्या वरच्या स्थानावर आहे. तर ज्या जाती सामाजिकदृष्ट्या निम्न स्थानी आहे त्या जातीची आर्थिक स्थिती अतिशय हलाखीची आहे. ऑटोवे म्हणतो, ‘‘शिक्षण ही समाजातच चालणारी प्रक्रिया आहे. तिची ध्येये व तिच्या पद्धती या ज्या समाजात ती प्रक्रिया चालते त्या समाजाच्या स्वरूपावर अवलंबून असते.’’[८] अध्ययनात ६८ टक्के विद्यार्थ्यांनी दोन महिण्यातून एकदा १५० रू. चे मोबाईल रिचार्ज करीत असल्याचे सांगितले. ७२ टक्के विद्यार्थ्यांनी लॉकडाऊनच्या काळात कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन पूर्णपणे बंद पडल्याचे सांगीतले. शेतीमध्ये व घरांच्या बांधकामावर मंजुरी करून जे उत्पन्न त्यांचे घरी आले असते ते कित्येक महिने आले नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयासमोर बिकट आर्थिक परिस्थिती ओढवली. ३६ टक्के उत्तरदात्यांनी स्वत:जवळ स्मार्टफोन नसल्यामुळे ऑनलाईन वर्गच केले नसल्याचे सांगीतले. तर ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिक्षण घेतले त्यातील ६५टक्के विद्यार्थ्यांनी आवाज बरोबर येत नसल्यामुळे व व्यवस्थित लिंक राहत नसल्यामुळे शिक्षकांनी शिकविलेले बरोबर समजले नसल्याचे म्हटले.

पारंपरिक शिक्षण पद्धतीमध्ये मित्र, शिक्षक यांच्याशी प्रत्यक्ष आंतरक्रिया होतात. त्यामुळे सामाजिक संबंध निर्माण होऊन संबंधाचे अनेक पैलू त्यांच्या व्यक्तिमत्वात विकसित होतात. सामाजिक संबंधांना दृढता येते. अनेक प्रकारच्या प्रक्रिया जसे – स्पर्धा, सहकार्य, संघर्ष व समायोजन अस्तित्वात येतात. यातून सामाजिकरण संपन्न होते. महाविद्यालय समूहात जेव्हा विद्यार्थी सहभागी होतो, तेव्हा त्यांचे सामाजिकरण

घडून येते. अध्ययनात पारंपरिक शिक्षण पद्धतीतून शिक्षक, मित्र व पर्यावरणाचा प्रत्यक्ष प्रभाव पडल्यामुळे आंतरक्रिया घडून येते व व्यक्तिमत्व विकसित होण्यास मदत होते, असे १०० टक्के विद्यार्थ्यांनी म्हटले आहे. व्यक्तिमत्वाचे तीन पैलू आहेत. स्मृती, संवेदनशिलता व बुद्धिमत्ता ज्याला आपण विश्लेषणाची क्षमता असे म्हणतो. हे पैलू कोविड–१९ मुळे ऑनलाईन शिक्षण पद्धती अस्तित्वात आली त्यामुळे विकसित झाले नाही. त्यांचा अध्ययनावर विपरित परिणाम झाल्याचे ९० टक्के विद्यार्थ्यांनी म्हटले आहे.

**निष्कर्ष –**

१. कोविड–१९ मुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेत खंड पडल्याचे दिसू येते.
२. कोविड–१९ मुळे उदयास आलेली ऑनलाईन शिक्षण पद्धती प्रभावी नाही.
३. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे कोविड १९ मुळे शिक्षण बंद झाले त्यामुळे त्यांनी घेतलेले शिक्षण विस्मृतीत गेले आहे.

**उपाययोजना –**

१. कोविड–१९ चा संसर्ग ग्रामीण भागात बऱ्याच प्रमाणात कमी झाल्यामुळे त्वरित शाळा, महाविद्यालये सुरू करावी.
२. शाळा, महाविद्यालये सुरू करून पारंपरिक पद्धतीने शिक्षण देण्यास सुरूवात करावी.
३. विद्यार्थ्यांचे शिक्षण मागील दिड वर्षापासून बंद असल्यामुळे विस्मृतीत गेलेले शिक्षण ब्रिजकोर्सच्या माध्यमातून पुन्हा शिकविण्यात यावे.

**संदर्भ ग्रंथसूची –**

१. कुंडले एन.बी., शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, २५० शनिवार, पुणे ३० (१९९०), पृ.४.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ (संपादकीय), महारा ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई (१९९३), पृ.४२३.
३. Whitehead A.N.-Aims of Education and other Essays, Pub Free press, the University of California, 1967, p.12.
४. Percy Nunn J. : Education – Its data and First Principle, Publisher create space Independent, publishing platform , 2017, p.17.
५. Kothari Commission Report : https//sites.google.com.date 12.6.2020.
६. डॉ. आगलावे प्रदिप, भारतीय समाज, संरचना आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३, पृ.१५९
७. कुंडले एम.बी., उपरोक्त,पृ.२४४.
८. मंडल आयोग अहवाल